

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(श्रेणीबद्ध स्वायत्तताप्राप्त विद्यापीठ)

## दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र

## शैक्षणिक वर्ष २०२६-२७

# प्रवेश माहितीपुस्तिका



# बी.ए. (दूरस्थ अध्ययन माध्यम) (सत्रांत पद्धती)

लेखन व संपादन


शिक्षणक्रम समन्वयक
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र

संचालक
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र


**ऑनलाईन प्रवेशासाठी**

http://unipune.ac.in/SOL/

**प्रवेश प्रक्रियेसाठी संपर्क**

student.sol@unipune.ac.in

# दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र

## शैक्षणिक वर्ष २०२६-२७

## शैक्षणिक सत्र जुलै-ऑगस्ट २०२६

## बी.ए. (दूरस्थ अध्ययन) (सत्रांत पद्धती) प्रवेश माहितीपुस्तिका


- प्रस्तावना
- दूरस्थ शिक्षण पद्धती
- उपलब्ध विषय
- प्रवेश पात्रता
- प्रवेश शुल्क
- प्रवेश प्रक्रिया
- प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे
- पाठ्यक्रम, अभ्यास साहित्य व प्राध्यापकांचे मार्गदर्शन
- परीक्षा पद्धती
- विद्यार्थ्यांसाठी महत्वाच्या सूचना
- अभ्यासक्रम – श्रेयांक आराखडा

## प्रस्तावना

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठास विद्यापीठ अनुदान आयोगाकडून 'प्रवर्ग-१' दर्जा बहाल करण्यात आला असून विद्यापीठाने 'श्रेणीबद्ध स्वायत्तता' प्राप्त केलेली आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार उच्च शिक्षण देशातील अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ नियमित शिक्षणपद्धतीसोबतच 'दूरस्थ' शिक्षण पद्धती उपलब्ध करून देत आहे.

विद्यापीठाच्या 'दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र' या विभागामार्फत विविध अभ्यासक्रम दूरस्थ अध्ययन पद्धतीने उपलब्ध करून देण्यात आले आहेत. नियमितपणे महाविद्यालयीन शिक्षण घेणे शक्य नसणाऱ्या वर्गासाठी (विशेषतः नोकरदारवर्ग, गृहिणी, जेष्ठ नागरिक, दुर्गम भागातील नागरिक, व्यवसायिक इ.) उच्च शिक्षणाची दालने खुली झालेली आहेत.

## 'दूरस्थ' शिक्षण पद्धती:

नियमितपणे महाविद्यालयामध्ये जाणे शक्य नसलेल्या विद्यार्थ्यांना उच्चशिक्षण घेणे हे 'दूरस्थ अध्ययन' पद्धतीमुळे सुलभ झालेले आहे. 'दूरस्थ अध्ययन' पद्धतीने प्राप्त पदवी ही नियमित महाविद्यालयांमध्ये जाऊन प्राप्त केलेल्या पदवी ससमकक्ष असल्याचे विद्यापीठ अनुदान आयोग (UGC), नवी दिल्ली यांचे द्वारे जाहीर करण्यात आले आहे.

दूरस्थ शिक्षण पद्धतीमध्ये विद्यार्थ्यास प्रवेशासाठी एक अभ्यास केंद्र (महाविद्यालय) निवडून अभ्यास केंद्रावर प्रवेश अर्ज जमा करणे आवश्यक असते. सदर अभ्यास केंद्रामधून विद्यार्थ्यास पाठ्यक्रमानुसार लिहिलेले अभ्यास साहित्य (पुस्तके) उपलब्ध होतात. तसेच प्राध्यापकांचे मार्गदर्शदेखील उपलब्ध होते. विद्यार्थ्याची परीक्षा ही अभ्यास केंद्रावर घेण्यात येते.

## उपलब्ध विषय:

दूरस्थ अध्ययन पद्धतीने पदवी स्तरावर बी.ए. अभ्यासक्रम मराठी तसेच इंग्लिश माध्यमातून उपलब्ध आहे. सदर अभ्यासक्रमामध्ये पुढीलप्रमाणे विषय उपलब्ध आहेत:

**१) बी.ए. (Bachelor of Arts):**

**विशेषस्तर** – मराठी /इंग्रजी /हिंदी /संस्कृत /इतिहास /अर्थशास्त्र / राज्यशास्त्र / समाजशास्त्र

**सामान्यस्तर** – मराठी / इंग्रजी / हिंदी / संस्कृत / इतिहास / अर्थशास्त्र / राज्यशास्त्र / समाजशास्त्र / भूगोलशास्त्र / शिक्षणशास्त्र

**प्रवेश पात्रता:**

बी.ए. अभ्यासक्रम प्रवेशाकरिता प्रवेश पात्रता पुढीलप्रमाणे आहे:
१) इंग्रजी विषयासह उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता १२वी) किंवा समकक्ष

२) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता१०वी) नंतर महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांची ३ वर्षांची पदविका (डिप्लोमा) किंवा समकक्ष

३) महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषद यांची इंग्रजी विषयासह पदविका

४) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता१०वी) नंतर किमान २ वर्ष कालावधीचे औद्योगिक प्रशिक्षण प्रमाणपत्र (I.T.I. Certificate)

**प्रवेश शुल्क:**

बी.ए. या शिक्षणक्रमाच्या प्रथम वर्षाचे शुल्क महाराष्ट्रातील शिक्षण मंडळाच्या विद्यार्थ्यांकरिता रु. ७८५०/- व महाराष्ट्राबाहेरील शिक्षण मंडळाच्या विद्यार्थ्यांकरिता रु. ८६७०/- इतके असून सदर शुल्क हे प्रवेश घेतेवेळी ऑनलाईन पद्धतीने भरायचे आहे. सदर शुल्कामध्ये नोंदणी शुल्क, शिकवणी शुल्क, पात्रता शुल्क, अभ्यास-साहित्य शुल्क, अभ्यासकेंद्र शुल्क व नियमित परीक्षा शुल्क यांचा समावेश असल्याने प्रवेशावेळी ऑनलाईन पद्धतीने प्रवेश शुल्क भरल्यानंतर इतर कोणतेही शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.

## प्रवेश प्रक्रिया

**ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया:**

विद्यार्थ्यास प्रथमत: विद्यापीठाच्या https://unipune.ac.in/sol/admissionjuly2026.html या संकेतस्थळावर ऑनलाईन नावनोंदणी करावयाची आहे. त्यानंतर प्रवेश अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरावयाचा आहे.

दूरस्थ अध्ययन पद्धतीमध्ये प्रवेश घेतेवेळी विद्यार्थ्यास एक अभ्यासकेंद्र निवडायचे आहे. विद्यापीठाने पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांमध्ये 'दूरशिक्षण' अभ्यासकेंद्रे उपलब्ध करून दिलेली आहेत. ऑनलाईन प्रवेश अर्जामध्ये अभ्यासकेंद्रांची यादी उपलब्ध आहे. प्रवेश अर्ज भरतेवेळी विद्यार्थ्यास अभ्यास केंद्रांच्या यादीमधून त्याच्या सोयीचे कोणतेही एक अभ्यासकेंद्र निवडता येईल.

त्यानंतर विद्यार्थ्यास अध्ययनाचे माध्यम व विषय निवडून प्रवेश शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरावयाचे आहे. शुल्क भरल्यानंतर विद्यार्थ्याने प्रवेश अर्ज (PDF File) डाउनलोड करून घ्यायचा आहे आणि त्याची छापील प्रत (print) काढून घ्यायची आहे. ऑनलाईन प्रवेश अर्ज भरतेवेळी कोणतीही कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करण्याची आवश्यकता नाही.

**अभ्यासकेंद्रावरील प्रवेश प्रक्रिया:**

विद्यार्थ्याने त्याच्या प्रवेश अर्जाची छापील प्रत आवश्यक त्या कागदपत्रांसह त्याने निवडलेल्या अभ्यासकेंद्रावर जमा करायची आहे. अभ्यासकेंद्रावर आवश्यक त्या कागदपत्रांसह प्रवेश अर्ज जमा केल्यानंतरच प्रवेश निश्चित होईल. तरी, विहित मुदतीमध्ये अभ्यासकेंद्रावर प्रवेश अर्ज जमा करणे आवश्यक आहे. विहित मुदतीमध्ये अभ्यासकेंद्रावर प्रवेश अर्ज जमा न केल्यास प्रवेश अर्ज रद्द होईल आणि प्रवेश होणार नाही.

## प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे:

ऑनलाईन प्रवेश अर्ज भरतेवेळी कोणतीही कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करण्याची आवश्यकता नाही. परंतु, ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर अभ्यासकेंद्रावर प्रवेश अर्ज जमाकरतेवेळी पुढील कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे:

१) प्रवेश अर्ज (अभ्यासकेंद्र प्रत)

२) प्रवेश अर्ज (विद्यार्थी प्रत)

३) आधारकार्ड (मूळ व झेरॉक्स प्रत)

४) पात्रता परीक्षेचे गुणपत्रक (मूळ व झेरॉक्स प्रत)

५) माध्यमिक शिक्षण (इयत्ता १०वीचे) प्रमाणपत्र (मूळ व झेरॉक्स प्रत)

६) विद्यार्थ्याच्या नावामध्ये बदल झालेला असल्यास त्याबाबतचा पुरावा (मूळ व झेरॉक्स प्रत)

७) पुढीलपैकी एक कागदपत्र (जे लागू असेल ते) (मूळ प्रत):

i) याआधीचा प्रवेश हा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न शाळा / कनिष्ठ महाविद्यालयात नियमित विद्यार्थी म्हणून घेतला असेल तर शाळा सोडल्याचा दाखला (Leaving Certificate) आवश्यक आहे.

ii) याआधीचा प्रवेश सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात अथवा विद्यापीठ विभागात नियमित किंवा बहिःस्थ विद्यार्थी म्हणून घेतला असेल तर, संबंधित विभागाचे स्थानांतर प्रमाणपत्र (Transfer Certificate) आवश्यक आहे.

(याआधीचा प्रवेश सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ‘दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र’ ('मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळा') या विभागामध्ये घेतला असेल तर **स्थानांतर प्रमाणपत्र (Transfer Certificate) आवश्यक नाही**.

iii) याआधीचा प्रवेश महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामध्ये बहिःस्थ (खाजगी) विद्यार्थी म्हणून घेतला असेल किंवा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाव्यतिरिक्त इतर कोणत्याही शिक्षण मंडळामध्ये घेतला असेल तर संबंधित शिक्षण मंडळाचे स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) आवश्यक आहे.

iv) याआधीचा प्रवेश सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाव्यतिरिक्त इतर कोणत्याही विद्यापीठामध्ये किंवा इतर विद्यापीठ संलग्न महाविद्यालयामध्ये घेतला असेल तर संबंधित विद्यापीठाचे स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) आवश्यक आहे.

v) विद्यार्थी अन्य ठिकाणी पदवी / पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास प्रवेशित असल्यास संबंधित महाविद्यालयाचे / विद्यापीठाचे बोनाफाईड आवश्यक आहे. (सदर विद्यार्थ्यांना स्थानांतर प्रमाणपत्र (Transfer Certificate) अथवा स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) आवश्यक नाही)

- अभ्यास केंद्रावर प्रवेश अर्ज जमा करतेवेळी विद्यार्थ्याकडे स्थानांतर / स्थलांतर प्रमाणपत्र (Transfer / Migration Certificate) नसेल तर विद्यार्थ्याने प्रवेश अर्जासोबत विहित नमुन्यातील हमीपत्र देणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र अभ्यास केंद्रावर जमा केल्यानंतरच विद्यार्थ्याचा प्रवेश निश्चित होईल.
- अभ्यास केंद्रावर प्रवेश अर्ज जमा करण्यापूर्वी विद्यार्थ्याने प्रवेश अर्जातील वैयक्तिक तपशील (नाव, मोबाईल क्रमांक, इ-मेलआयडी, पत्ता, जन्म दिनांक इ.) काळजीपूर्वक तपासून पाहणे आवश्यक आहे. यामध्ये काही दुरुस्ती करावयाची असल्यास विहित नमुन्यातील अर्ज प्रवेश अर्जासोबत अभ्यासकेंद्रावर जमा करणे आवश्यक आहे.

## पाठ्यक्रम, अभ्यास साहित्य व प्राध्यापकांचे मार्गदर्शन

दूरस्थ अध्ययन पद्धतीच्या विविध शिक्षणक्रमांकरिता पाठ्यक्रम (syllabus) दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या http://unipune.ac.in/SOL/ या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. सदर पाठ्यक्रम सर्व अभ्यास केंद्रांवर लागू असेल. पाठ्यक्रमानुसार लिहिलेले अभ्यास साहित्य हे छापील स्वरूपात उपलब्ध आहे. सर्व प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यास अभ्यास साहित्य (पुस्तके) उपलब्ध होतील. पुणे शहरातील अभ्यास केंद्रांवर प्रवेशित विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रामधून पुस्तके उपलब्ध होतील आणि पुणे शहराबाहेरील विद्यार्थ्यांना त्यांनी प्रवेशावेळी निवडलेल्या अभ्यास केंद्रातून पुस्तके उपलब्ध होतील.

प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यांनंतर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी अभ्यास केंद्राद्वारे प्रथमत: "उद्बोधन वर्ग" आयोजित करण्यात येतो. विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आलेल्या पुस्तकांचा उपयोग करून 'स्वयं-अध्ययन' कसे करावे याबाबत मार्गदर्शन करण्यात येते. अभ्यास केंद्रामार्फत प्रत्येक विषयासाठी मार्गदर्शनपर संमंत्रण सत्रे ही रविवारी अथवा सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी आयोजित करण्यात येतात. सदर सत्रांमध्ये विद्यार्थ्यांना येणाऱ्या संबंधित विषयाच्या अडचणी / शंका यांचे निरसन शिक्षकांमार्फत करण्यात येते. तरी, विद्यार्थ्यांनी सदर सत्रांमध्ये सक्रियपणे सहभागी होणे त्यांच्या हिताचे आहे. तसेच सदर सत्रांदरम्यान अंतर्गत मूल्यमापनाबाबतदेखील सूचना देण्यात येते.

## परीक्षा पद्धती:

प्रत्येक विषयासाठी अंतर्गत व सत्रांत परीक्षा घेण्यात येते. अंतर्गत व सत्रांत परीक्षेतील गुणांचे प्रमाण ३०:७० असे असते. अंतर्गत परीक्षा ही अभ्यास केंद्रामार्फत घेण्यात येते. याबाबतचा तपशील अभ्यासकेंद्रामार्फत विद्यार्थ्यांना वेळोवेळी अभ्यासकेंद्रामार्फत देण्यात येतो.

सत्रांत परीक्षा ही लेखी स्वरूपाची परीक्षा विद्यापीठाच्या परीक्षा विभागामार्फत साधारणत: डिसेंबर-जानेवारी व जून महिन्यामध्ये आयोजित करण्यात येते. सदर परीक्षा पुणे, पिंपरी-चिंचवड, माळेगाव बु. (बारामती), अहमदनगर, नाशिक, रावळगाव, सिल्वासा या केंद्रांवर आयोजित करण्यात येते. विद्यार्थी संख्येनुसार इतर ठिकाणीदेखील परीक्षा आयोजित केली जाऊ शकते. सदर परीक्षेचे वेळापत्रक व प्रश्नपत्रिकेचा आराखडा इ. बाबतची माहिती दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या संकेतस्थळावर वेळोवेळी देण्यात येते.

उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक विषयामध्ये अंतर्गत परीक्षा आणि सत्रांत परीक्षा अशा दोन्ही परीक्षेत स्वतंत्ररित्या किमान ४० % गुण मिळविणे आवश्यक आहे. कोणत्याही विषयात उत्तीर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यास त्या विषयाचे श्रेयांक मिळतील. प्रथम वर्षाच्या एकूण श्रेयांकांपैकी किमान ५० % श्रेयांक मिळाल्यास विद्यार्थी द्वितीय वर्ष प्रवेशास पात्र असेल. बी.ए. शिक्षणक्रमाच्या तृतीय वर्षास प्रवेश घेतेवेळी विद्यार्थ्यास प्रथम वर्षाचे सर्व श्रेयांक मिळणे (सर्व विषय उत्तीर्ण होणे) तसेच द्वितीय वर्षाचे किमान ५० % श्रेयांक मिळणे आवश्यक आहे.

बी.ए. शिक्षणक्रमास प्रवेश घेतल्यापासून जास्तीत जास्त ६ वर्षांमध्ये अभ्यासक्रम पूर्ण करता येईल. (एकूण ६ वर्ष कालावधीमध्ये सर्व विषय उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.) त्यानंतर विद्यार्थ्यांचा नोंदणी कालावधी समाप्त होत असल्याने विद्यार्थ्यास परीक्षा देता येत नाही. अशा विद्यार्थ्यांना नव्याने नावनोंदणी करून पुन्हा प्रथम वर्षास प्रवेश घ्यावा लागेल आणि तीनही वर्षांच्या सर्व परीक्षा पुन्हा नव्याने द्याव्या लागतील.

## विद्यार्थ्यांसाठी महत्वाच्या सूचना:

१) ऑनलाईन नावनोंदणी व प्रवेश अर्ज भरतेवेळी विद्यार्थ्यांनी दिलेल्या मोबाईल क्रमांकावर विद्यापीठाकडून व महाविद्यालयाकडून संदेश (message) येत असल्याने विद्यार्थ्याने स्वतःचा मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी वापरावा.

२) ऑनलाईन नावनोंदणी अर्जामध्ये विद्यार्थ्याने स्वत:चे नाव आधार कार्डवरील नावाप्रमाणेच भरावे.

३) ऑनलाईन नावनोंदणी करतेवेळी मोबाईलवर मिळालेल्या संदेशामधील UserID जपून ठेवावा. सदर UserID चा वापर पुढे विद्यार्थ्यास त्याच्या प्रोफाइलला लॉगिन करण्यासाठी, नोंदणीक्रमांक (PRN) मिळविण्यासाठी तसेच परीक्षा प्रवेशपत्र मिळविण्यासाठी होत असल्याने, सदर UserID अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत जपून ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.

४) प्रवेश प्रक्रियेबाबत मदतीसाठी विद्यार्थ्यांना student.sol@unipune.ac.in या इ-मेलआयडीवर दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राशी संपर्क करता येईल. इ-मेल मध्ये विद्यार्थ्याने स्वतःचे नाव, मोबाईल क्रमांक, अभ्यासक्रमाचे नाव, अभ्यासकेंद्राचे नाव, अर्जक्रमांक (अर्ज पूर्ण भरला असल्यास) इ. तपशील नमूद करावा.

५) ऑनलाईन प्रवेश शुल्क भरतेवेळी बँक अकाउंटमधून पैसे वजा झाले असतील (transaction successful) आणि प्रवेश अर्ज (PDF) डाउनलोड होत नसेल तर पुन्हा शुल्क भरू नये (Double Payment करू नये) आणि student.sol@unipune.ac.in या इ-मेलआयडीवर त्वरित पुढील तपशील पाठविण्यात यावा:
बँकेचे नाव, transaction ID आणि पेमेंट पद्धती- कार्ड / UPI / नेटबँकिंग

६) बी.ए. व बी. कॉम. अभ्यासक्रमास प्रवेश घेणारे जे विद्यार्थी इयत्ता १२वीची परीक्षा CBSE, ICSE, NIOS मधून उत्तीर्ण झाले आहेत त्यांनी प्रवेश अर्जामध्ये शैक्षणिक पात्रता भरतेवेळी 'दिल्ली' हे राज्य निवडावे.

७) प्रवेश सूचनेमध्ये दिलेल्या विहित मुदतीमध्ये अभ्यास केंद्रावर आवश्यक त्या कागदपत्रांसह प्रवेश अर्ज जमा न केल्यास प्रवेश अर्ज रद्द होईल आणि प्रवेश होणार नाही, याची नोंद घ्यावी.

८) ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यावर प्रवेश अर्ज २ प्रतींमध्ये डाउनलोड होतो. त्यातील अभ्यासकेंद्र प्रत ही महाविद्यालयामध्ये जमा करावी आणि विद्यार्थी प्रतीवर अभ्यासकेंद्राचा शिक्का घेऊन ती प्रत आपला अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत जपून ठेवावी.

९) ऑनलाईन प्रवेश अर्ज भरतेवेळी विषय व अध्ययनाचे माध्यम काळजीपूर्वक निवडावे. निवडलेले विषय / माध्यम यामध्येबदल करावयाचा असेल तर नियमानुसार शुल्क आकारण्यात येईल.

१०) प्रवेशप्रक्रिया, परीक्षा, निकाल इत्यादीबाबतच्या वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सूचनांसाठी विद्यार्थ्याने http://unipune.ac.in/sol/ या संकेतस्थळास नियमितपणे भेट देणे आवश्यक आहे.

११) अंतर्गत परीक्षा ही अभ्यासकेंद्रामार्फत घेतली जात असल्याने विद्यार्थ्यांनी नियमितपणे अभ्यासकेंद्रांच्या संपर्कात राहून केंद्रामार्फत वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सूचनांनुसार अंतर्गत परीक्षा विहित मुदतीमध्ये देणे आवश्यक आहे.

१२) अनुशेषित परीक्षा अर्ज भरणे, पुढील वर्षांमध्ये प्रवेश घेण्यासाठी प्रवेश अर्ज भरणे याबाबतच्या सूचना http://unipune.ac.in/sol/ या संकेतस्थळावर देण्यात येतात. सदर अर्ज भरण्यासाठी ठराविक मुदत असते. सबब, विद्यार्थ्यांनी दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या संकेतस्थळास नियमितपणे भेट देऊन विहित मुदतीत ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक आहे.

१३) प्रवेश प्रक्रियेदरम्यान काही मदत हवी असल्यास विद्यार्थ्यांनी student.sol@unipune.ac.in या इ-मेल आयडीवर संपर्क करावा. तसेच विद्यार्थ्यांना अभ्यास केंद्रावरदेखील प्रवेश प्रक्रियेबाबत मार्गदर्शन उपलब्ध होईल.

## अभ्यासक्रम – श्रेयांक आराखडा:

## बी.ए.

### प्रथम वर्ष बी.ए.

**F.Y.B.A. Semester-I**

| Code | Subject | Credits |
|---|---|---|
| **Compulsory Subjects:** | | |
| 111 - I | Compulsory English - I | 3 |
| **Any One of the following:** | | |
| 112 - I | Marathi - I | 3 |
| 113 - I | Hindi - I | 3 |
| 114 - I | Sanskrit - I | 3 |
| 115 - I | Optional English - I | 3 |
| **Any 4 of the following:** | | |
| 116 - I | Education - I | 3 |
| 117 - I | Economics - I | 3 |
| 118 - I | Political Science - I | 3 |
| 119 - I | History - I | 3 |
| 120 - I | Public Administration - I | 3 |
| 121 – I | Psychology – I | 3 |
| 123 – I | Sociology – I | 3 |
| 124 – I | Geography – I | 3 |
| **Compulsory Add-On Subject:** | | |
| AOC 1 | Human Rights | 4 |

**F.Y.B.A. Semester-II**

| Code | Subject | Credits |
|---|---|---|
| **Compulsory Subjects:** | | |
| 111 - II | Compulsory English - II | 3 |
| **One of the following:** | | |
| 112 - II | Marathi - II | 3 |
| 113 - II | Hindi - II | 3 |
| 114A - II | Sanskrit - II | 3 |
| 114B - II | Optional English - II | 3 |
| **4 of the following:** | | |
| 116 - II | Education - II | 3 |
| 117 - II | Economics - II | 3 |
| 118 - II | Political Science - II | 3 |
| 119 - II | History - II | 3 |
| 120 - II | Public Administration – II | 3 |
| 121 – II | Psychology – II | 3 |
| 123 – II | Sociology – II | 3 |
| 124 – II | Geography – II | 3 |
| **Compulsory Add-On Subject:** | | |
| AOC 2 | Cyber Security | 4 |

प्रथम सत्रास निवडलेले वैकल्पिक विषय द्वितीय सत्रास देखील लागू राहतील. प्रथम वर्षास Optional English हा विषय निवडला असेल तरच द्वितीय वर्ष बी.ए. या वर्गामध्ये इंग्रजी विषय हा विशेष स्तरावर निवडता येईल. संस्कृत या विषयासाठी पुस्तके व परीक्षा यांचे माध्यम फक्त मराठी आहे (संस्कृत या विषयासाठी इंग्रजी माध्यम उपलब्ध नाही).

## द्वितीय वर्ष बी.ए.

**S.Y.B.A. Semester-III**

| Code | Subject | Credits |
|---|---|---|
| **Compulsory Subjects:** | | |
| AECC – I | Environmental Studies | 2 |
| CC-A – I | Compulsory English | 3 |
| **Any One of the following:** | | |
| EC – I | English Communication | 2 |
| MIL 1 – I | Marathi Language | 2 |
| MIL 2 – I | Hindi Language | 2 |
| **Three of the following:** | | |
| SEC1-A – I | English | 3 |
| SEC1-D – I | Sanskrit | 3 |
| SEC1-K – I | Sociology | 3 |
| CC-B – I | Marathi | 3 |
| CC-C – I | Hindi | 3 |
| CC-E – I | History | 3 |
| CC-G – I | Economics | 3 |
| CC-H – I | Political Science | 3 |
| CC-J – I | Public Administration | 3 |
| CC-M - I | Education | 3 |
| CC-P - I | Geography | 3 |
| **One group from the following:** | | |
| DSE1-A - I | English | 3 |
| DSE2-A - I | | 3 |
| SEC2-A - I | | 2 |
| DSE1-B - I | Marathi | 3 |
| DSE2-B - I | | 3 |
| SEC2-B - I | | 2 |
| DSE1-C - I | Hindi | 3 |
| DSE2-C - I | | 3 |
| SEC2-C - I | | 2 |
| DSE1-D - I | Sanskrit | 3 |
| DSE2-D - I | | 3 |
| SEC2-D - I | | 2 |
| DSE1-E - I | History | 3 |
| DSE2-E - I | | 3 |
| SEC2-E - I | | 2 |
| DSE1-G - I | Economics | 3 |
| DSE2-G - I | | 3 |
| SEC2-G - I | | 2 |
| DSE1-H - I | Political Science | 3 |
| DSE2-H - I | | 3 |
| SEC2-H - I | | 2 |
| DSE1-J - I | Public Administration | 3 |
| DSE2-J - I | | 3 |
| SEC2-J - I | | 2 |
| DSE1-K - I | Sociology | 3 |
| DSE2-K - I | | 3 |
| SEC2-K - I | | 2 |
| **Compulsory Add-On Subject:** | | |
| AOC 3 | Introduction to Constitution | 2 |

**S.Y.B.A. Semester-IV**

| Code | Subject | Credits |
|---|---|---|
| **Compulsory Subjects:** | | |
| AECC – II | Environmental Studies | 2 |
| CC-A – II | Compulsory English | 3 |
| **One of the following:** | | |
| EC – II | English Communication | 2 |
| MIL 1 – II | Marathi Language | 2 |
| MIL 2 – II | Hindi Language | 2 |
| **Three of the following:** | | |
| SEC1-A – II | English | 3 |
| SEC1-D – II | Sanskrit | 3 |
| SEC1-K – II | Sociology | 3 |
| CC-B – II | Marathi | 3 |
| CC-C – II | Hindi | 3 |
| CC-E – II | History | 3 |
| CC-G – II | Economics | 3 |
| CC-H – II | Political Science | 3 |
| CC-J – II | Public Administration | 3 |
| CC-M - II | Education | 3 |
| CC-P - II | Geography | 3 |
| **One group from the following:** | | |
| DSE1-A - II | English | 3 |
| DSE2-A - II | | 3 |
| SEC2-A - II | | 2 |
| DSE1-B - II | Marathi | 3 |
| DSE2-B - II | | 3 |
| SEC2-B - II | | 2 |
| DSE1-C - II | Hindi | 3 |
| DSE2-C - II | | 3 |
| SEC2-C - II | | 2 |
| DSE1-D - II | Sanskrit | 3 |
| DSE2-D - II | | 3 |
| SEC2-D - II | | 2 |
| DSE1-E - II | History | 3 |
| DSE2-E - II | | 3 |
| SEC2-E - II | | 2 |
| DSE1-G - II | Economics | 3 |
| DSE2-G - II | | 3 |
| SEC2-G - II | | 2 |
| DSE1-H - II | Political Science | 3 |
| DSE2-H - II | | 3 |
| SEC2-H - II | | 2 |
| DSE1-J - II | Public Administration | 3 |
| DSE2-J - II | | 3 |
| SEC2-J - II | | 2 |
| DSE1-K - II | Sociology | 3 |
| DSE2-K - II | | 3 |
| SEC2-K - II | | 2 |

**द्वितीय वर्ष बी.ए.**

- सत्र-३ मध्ये निवडलेले वैकल्पिक विषय सत्र-४मध्ये देखील लागू राहतील. Environmental Studies आणि Compulsory English हे दोन्ही विषय अनिवार्य आहेत.
- English Communication, Marathi Language आणि Hindi Language यापैकी कोणताही १ विषय निवडता येईल.
- **'SEC1'** आणि **'CC'** या विषय गटामध्ये English / Sanskrit / Sociology / Marathi / Hindi / History / Economics / Political Science / Public Administration / Education / Geography यापैकी तीन विषय निवडायचे आहेत. जो विषय विशेष स्तरावर निवडायचा आहे, तो विषय या गटामध्ये निवडणे अनिवार्य राहील.
- प्रथम वर्षास निवडलेल्या विषयांमधूनच या गटातील ३ विषय निवडता येतील.
- **'DSE1, DSE2, SEC2'** हा विशेष स्तरावील विषय गट राहील. विशेष स्तरावर English / Marathi / Hindi / Sanskrit / History / Economics / Political Science / Public Administration / Sociology हे विषय उपलब्ध आहेत. प्रथम वर्षास निवडलेल्या विषयांमधूनच कोणत्याही १ विषयाचा गट निवडता येईल. प्रथम वर्षास Optional English हा विषय निवडला असेल तरच English विषय हा विशेष स्तरावर निवडता येईल.
- विशेष स्तरावील गटामध्ये जो विषय निवडलेला आहे, तो विषय **'SEC1'** किंवा **'CC'** या विषय गटामध्येदेखील निवडणे आवश्यक राहील.
- संस्कृत या विषयासाठी पुस्तके व परीक्षा यांचे माध्यम फक्त मराठी आहे (इंग्रजी माध्यम उपलब्ध नाही).

## तृतीय वर्ष बी.ए.

**T.Y.B.A. Semester-V**

| Code | Subject | Credits |
|---|---|---|
| **Compulsory Subjects:** | | |
| GE - I | Generic Elective | 2 |
| CC2-A - I | Compulsory English | 3 |
| **Three of the following:** | | |
| SEC3-A - I | English | 3 |
| SEC3-D - I | Sanskrit | 3 |
| SEC3-K - I | Sociology | 3 |
| CC2-B - I | Marathi | 3 |
| CC2-C - I | Hindi | 3 |
| CC2-E - I | History | 3 |
| CC2-G - I | Economics | 3 |
| CC2-H - I | Political Science | 3 |
| CC2-J - I | Public Administration | 3 |
| CC2-M - I | Education | 3 |
| CC2-P - I | Geography | 3 |
| **One group from the following:** | | |
| DSE3-A - I | English | 3 |
| DSE4-A - I | | 3 |
| SEC4-A - I | | 2 |
| DSE3-B - I | Marathi | 3 |
| DSE4-B - I | | 3 |
| SEC4-B - I | | 2 |
| DSE3-C - I | Hindi | 3 |
| DSE4-C - I | | 3 |
| SEC4-C - I | | 2 |
| DSE3-D - I | Sanskrit | 3 |
| DSE4-D - I | | 3 |
| SEC4-D - I | | 2 |
| DSE3-E - I | History | 3 |
| DSE4-E - I | | 3 |
| SEC4-E - I | | 2 |
| DSE3-G - I | Economics | 3 |
| DSE4-G - I | | 3 |
| SEC4-G - I | | 2 |
| DSE3-H - I | Political Science | 3 |
| DSE4-H - I | | 3 |
| SEC4-H - I | | 2 |
| DSE3-J - I | Public Administration | 3 |
| DSE4-J - I | | 3 |
| SEC4-J - I | | 2 |
| DSE3-K - I | Sociology | 3 |
| DSE4-K - I | | 3 |
| SEC4-K - I | | 2 |

**T.Y.B.A. Semester-VI**

| Code | Subject | Credits |
|---|---|---|
| **Compulsory Subjects:** | | |
| GE - II | Generic Elective | 2 |
| CC2-A - II | Compulsory English | 3 |
| **Three of the following:** | | |
| SEC3-A - II | English | 3 |
| SEC3-D - II | Sanskrit | 3 |
| SEC3-K - II | Sociology | 3 |
| CC2-B - II | Marathi | 3 |
| CC2-C - II | Hindi | 3 |
| CC2-E - II | History | 3 |
| CC2-G - II | Economics | 3 |
| CC2-H - II | Political Science | 3 |
| CC2-J - II | Public Administration | 3 |
| CC2-M - II | Education | 3 |
| CC2-P - II | Geography | 3 |
| **One group from the following:** | | |
| DSE3-A - II | English | 3 |
| DSE4-A - II | | 3 |
| SEC4-A - II | | 2 |
| DSE3-B - II | Marathi | 3 |
| DSE4-B - II | | 3 |
| SEC4-B - II | | 2 |
| DSE3-C - II | Hindi | 3 |
| DSE4-C - II | | 3 |
| SEC4-C - II | | 2 |
| DSE3-D - II | Sanskrit | 3 |
| DSE4-D - II | | 3 |
| SEC4-D - II | | 2 |
| DSE3-E - II | History | 3 |
| DSE4-E - II | | 3 |
| SEC4-E - II | | 2 |
| DSE3-G - II | Economics | 3 |
| DSE4-G - II | | 3 |
| SEC4-G - II | | 2 |
| DSE3-H - II | Political Science | 3 |
| DSE4-H - II | | 3 |
| SEC4-H - II | | 2 |
| DSE3-J - II | Public Administration | 3 |
| DSE4-J - II | | 3 |
| SEC4-J - II | | 2 |
| DSE3-K - II | Sociology | 3 |
| DSE4-K - II | | 3 |
| SEC4-K - II | | 2 |

Generic Elective आणि Compulsory English हे दोन्ही विषय अनिवार्य आहेत. उर्वरित विषय गटांमध्ये द्वितीय वर्षास निवडलेले विषय निवडता येतील.

— — — — — — — — —